



A.P.M.C/WRR/G.VAP/67

# कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा जि. चंद्रपूर

## व्यापाऱ्यास, अडत्यास किंवा दलालास द्यावयाची अनुज्ञाप्ती

नमुना १ नियम ६ (२) पहा

## बाजारात धंदा करण्यासाठी म्हणून व्यापाऱ्यास, अडत्यास, किंवा दलालास द्यावयाची अनुज्ञाप्ती

**कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा**

**धंदा करण्यासाठी अनुज्ञाप्ती**

श्री मे. कांचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमीटेड वरोरा तर्फे १) यशवंत संभाजी साखरे (सचिव)

पत्ता आनंदवन चौक, वरोरा २) बालाजी नथ्थुजी घोटे (C.E.O)

यांना ज्याचा यात यापुढे अनुज्ञाप्तीधारी असा उल्लेख करण्यात आला आहे. रुपये ....२००/-.... फी दिल्यानंतर वरोरा, शेगांव (बु.), माढेळी येथील मुख्य/दुय्यम बाजारात धान्य, कडधान्य, तेलबिया, कापूस, इत्यादी घोषित कृषि उत्पन्नाचा व्यवसाय करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) नियम १९६७ आणि बाजार समितीचे उपविधी यांच्या उपबंधास आधीन राहून यास याव्दारे अनुज्ञाप्ति मंजूर करण्यात येत आहे.

## शर्ती खालील प्रमाणे

१) अनुज्ञाप्तीधारीने, महाराष्ट्र शेतकी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३, महाराष्ट्र कृषि उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) नियम, १९६७ या शेती उत्पन्न बाजार समितीचे उपविधी यांच्या उपबंधाचे आणि ....९३/८/९८.... रोजी अनुज्ञाप्तीधारीने बाजार समितीशी केलेल्या कराराच्या शर्तीचे पालन केले पाहिजे.

२) ही अनुज्ञाप्ती २८ फरवरी पर्यंत उक्त दिवस धरून वैध असेल, आणि त्यानंतर त्याचे नुतनीकरण केले असल्याखेरीज ती चालणार नाही.

३) अनुज्ञाप्तिचे हस्तांतरण करता येणार नाही.

४) हा अधिनियम आणि त्याअन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधास अनुसरुन ही अनुज्ञाप्ति रद्द केली जाण्यास, तहकुब केली जाण्यास पात्र असेल.

५) ही अनुज्ञाप्ति रद्द करण्यात, तहकुब करण्यास आल्यास अनुज्ञाप्तिधारीने ती संचालकाच्या/बाजार समितींच्या स्वाधीन केली पाहिजे.

६) अनुज्ञाप्तिधारकांने केवळ ..धान्य व्यापारी.. म्हणूनच आणि ज्या जागासाठभ अनुज्ञाप्ति देण्यात आली असेल त्याच जागांमध्ये धंदा केला पाहिजे आणि अनुज्ञाप्तिधारकांने त्याला, या नियमान्वये दिलेल्या दुसऱ्या अनुज्ञाप्तिनुसार कोणत्याही इतर धंद्याकरिता असल्या खेरीज, या बाजार कार्यकर्त्यांच्या धंद्याशिवाय त्यांनी बाजार क्षेत्रात इतर कोणताही धंदा करता कामा नये.

७) अनुज्ञाप्तिधारीने, कोणत्याही जाहीर केलेल्या शेतीच्या उत्पन्नाची भेसळ करता किंवा करविता कामा नये.

८) अनुज्ञाप्तिधारीने, बाजार समितीची फी टाळल्यास प्रतिबंध करण्यांचे कामी संचालकास/बाजार समितीस मदत केली पाहिजे.

९) अनुज्ञाप्तिधारी हा, ज्यांची नावे देण्यात आली आहेत अशा त्यांच्या सहाय्यखेरीज इतर कोणास जाहीर केलेल्या शेती उत्पन्नाच्या खेरदी विक्रीच्या कामी कामास लावणार नाही.

येथे अनुज्ञाप्तिधारीने कामास लावलेल्या सहाय्यकांची नावे द्यावीत.

१) ......................................................

२) ......................................................

३) ......................................................

१०) अनुज्ञाप्तिधारीने, बाजार समिती/संचालक फर्मावील त्या रीतीने पुस्तक, नोंदणीपुस्तके आणि दस्तऐवज ठेवले पाहिजेत, आणि सभापती, उपसभापती, चिटणीस किंवा बाजार समितीने प्राधिकृत केलेला इतर अधिकारी यास तपासणीसाठी म्हणून उक्त पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत.

११) अनुज्ञाप्तिधारीने, बाजार समितीस/संचालकास वेळोवेळी आवश्यक वाटेल अशी माहिती आणि विवरणे दिली पाहिजे.

१२) अनुज्ञाप्तिधारीने, बाजार समितीच्या उपविधीअन्वये अनुज्ञेय असेल अशा रीतीने शेती उत्पन्नाची किंमत निश्चित केली पाहिजे. अनुज्ञाप्तिधारीने, बाजार समितीच्या उपविधीअन्वये अनुज्ञेय असेल अशा रीतीने शेती उत्पन्नाची किंमत निश्चित केली पाहिजे. (आणि) महाराष्ट्र शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्री (नियमन) नियम, १९६७ नुसार लेखाचिठ्ठी/किंवा खरेदी (देयके) बिले

दिली पाहिजेत.) चौकोनी कंसामधील मजकूर दलालास लागू नाही.

१३) अनुज्ञाप्तीमध्ये, जर शेतीचे उत्पन्न त्याच्याच अभिकरणामार्फत/ त्याचकडून विकण्यात येईल तर, त्याच दिवशी शेती उत्पन्नाचे विक्रेत्यास किंमत दिली पाहीजे.

१४) अनुज्ञाप्तिधारकाने, हा अधिनियम, नियम व उप-विधी यातील तरतुदीनुसार ठरविलेल्या फी खेरीज कोणतीही फी मागता कामा नये किंवा ती वसुल करिता कामा नये.

१५) अनुज्ञाप्तिधारीने, व्यापारविषयक कोणतीही सुट देता किंवा वसुल करता कामा नये.

१६) अनुज्ञाप्तिधारीने, दलाल म्हणून व्यापाऱ्या व्यापाऱ्यातील व्यवहार व कोंबड्या, गुरे, मेंढरे व बकरी खेरीज करुन, इतर जाहीर केलेल्या शेतीच्या उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात काम करता कामा नये. (ही तरतूद फक्त दलालास लागे आहे.)

१७) अनुज्ञाप्तिधारीने, केवळ अधिकृत वजने व मापे यांची तरतूद केली पाहिजे आणि संचालक/बाजार समितीकडून मान्य करण्यात येईल अशाच ठिकाणी वजन करण्याचे काम केले पाहिजे.

१८) अनुज्ञाप्तिधारीने अनुज्ञाप्ति देण्यात आलेल्या वजन करणाऱ्यास किंवा मापणाऱ्यास, हमालास, संचालक/बाजार समिती मान्य करील अशा दरानेच केवळ पैसे दिले पाहिजेत आणि कोणत्याही घरगुती किंवा खाजगी कामावर त्यास लावता कामा नये. (ही तरतुद फक्त अडत्यास लागू आहे.)

१९) अनुज्ञाप्तिधारीने, (अडत्यास लागू असलेला) नियम ८ मध्ये दिलेल्या शर्ती पूर्ण केल्यानंतर असेल त्याशिवाय त्याच्या स्वतःच्या नावाने किंवा स्वतःच्या आणि इतरांच्या संयुक्तपणे, त्याच्या अडतीत आणण्यात आलेल्या शेती उत्पन्नाची खरेदी करता कामा नये.

२०) अनुज्ञाप्तिधारीने, पेढीच्या भागीदारीत, करण्यात आलेला कोणताही बदल असल्यास, संचालकास/बाजार समितीस कळविला पाहिजे.

२१) अनुज्ञाप्तिधारीने, शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्री संबंधातील त्याचे सर्व विवाद महाराष्ट्र कृषि उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ अन्वये तरतूद केलेल्या रितीने पाठविले पाहिजेत.

*दिनांक* :- २५/६/२०१८

सचिव
*कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा*

## -: अनुज्ञाप्तिचे नुतनीकरण :-

| नुतनीकरणाची तारीख | ज्या मुदती करिता नुतनीकरण करण्यात आले, ती मुदत | सचिवाची सही व तारीख |
|---|---|---|
| २५/२/२०१९ | सन २०१९-२०२० | सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा, जि. चंद्रपूर |
| १७/०३/२०२० | सन २०२०-२०२१ | सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा, जि. चंद्रपूर |
| २३/०३/२०२१ (३२७३) | सन २०२१-२०२२ | सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा, जि. चंद्रपूर |
| ११/०३/२०२२ (१७४) | सन २०२२-२०२३ | सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, वरोरा जि. चंद्रपूर. |
| २७/०२/२०२३ (१४०४) | २०२३- २०२४ | सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा जि. चंद्रपूर |